|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

(Formerly North Maharashtra University, Jalgaon)

**परीक्षा व मूल्यमापन विभाग**

जा.क्र. :कबचौउमवि/७-ह/ प.गै. / ४२०५ /१९ दिनांक:-१६/०८/२०१९

प्रति,

१. **मा. प्राचार्य/ संचालक,**
**कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व परिसंस्था**

२. **मा. संचालक / विभागप्रमुख ,**
**कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सर्व शैक्षणिक प्रशाळा / विभाग**

**विषयः- परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निकाल पत्रांबाबत......**

महोदय/ महोदया,

माहे मार्च/एप्रिल/मे २०१९ मध्ये विद्यापीठाव्दारे आयोजित करण्यात आलेल्या विविध परीक्षांमध्ये जे विद्यार्थी परीक्षेत गैरप्रकार करतांना आढळून आले होते. अशा विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकुन घेण्यासाठी खालील तारखांना परीक्षा गैरप्रकार चौकशी समितीची सभा आयोजित करण्यात आलेली होती.

| अ.क्र. | सभेची तारीख | उपस्थित विद्यार्थ्यांची संख्या (केस नंबर) |
|---|---|---|
| ०१. | दि.५ जुलै, २०१९ | ०१ ते १०० |
| ०२. | दि.१३ जुलै, २०१९ | १०१ ते २०० |
| ०३. | दि.२७ जुलै, २०१९ | ३०१ ते ४०० |
| ०४. | दि.३१ जुलै, २०१९ | ४०१ ते ४९२ |
| ०५. | दि.२ ऑगस्ट, २०१९ | २०१ ते ३०० |
| ०६. | दि.१४ ऑगस्ट, २०१९ | उपरोक्त सभेस गैरहजर असलेले विद्यार्थी |

उपरोक्त अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील जे विद्यार्थी परीक्षेत गैरप्रकार करतांना आढळून आलेले होते. त्यांच्या गैरप्रकारासंदर्भात समितीने घेतलेल्या निर्णयाची पत्रे त्यांच्या पुढील वर्गाच्या प्रवेशासाठी व त्यांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या दृष्टिने सोयीचे व्हावे याकरीता विद्यापीठाच्या संकेत स्थळावर (www.nmu.ac.in) मध्ये Student Corner ----Examination ----- Unfairmeans (Copycase) / Lapses या सदराखाली उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सदर पत्रे संबंधित तारखेस त्यांच्या उपस्थितीनुसार व त्यांना दिलेल्या शिक्षेनुसार ती वर्गीकृत करण्यात आलेली आहे. त्यामुळे कृपया संबंधित विद्यार्थ्यांचे पत्र डाऊनलोड करून पुढील योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी,ही विनंती.

तसेच परीक्षा गैरप्रकार प्रकरणी विद्यापीठाकडून होणारा पत्रव्यवहार/ सूचना/ माहिती यापुढे याच संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करून देण्यात येईल, याचीही कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू ,

**संचालक**
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

- **प्रत माहितीसाठी -**
  १. मा.कुलगुरु महोदय, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
  २. मा.प्र-कुलगुरु महोदय, कबचौउमवि, जळगाव
  ३. सहा.कुलसचिव/ कक्षाधिकारी , संबंधित विद्याशाखा , परीक्षा व मुल्यमापन विभाग, कबचौउमवि, जळगाव

पत्रव्यवहाराचा पत्ता : पोस्ट बॉक्स नं. ८०, उमविनगर, जळगाव ☎ (०२५७) २२५७३१० फॅक्स (०२५७) २२५८४०७